दिनांक.०१/१०/२०१८

# प्रेसनोट

## घरफोडी चोरी करणारा अटकेत

## भारती विद्यापिठ पोलिस ठाणेची कामगिरी

दि.२४/०९/२०१८ रोजी **भारती विद्यापिठ पोलीस ठाणे** हददीत घरफोडी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड व कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना **पोलिस कर्मचारी उज्वल मोकाशी व शिवदत्त गायकवाड** यांना माहीती मिळाली की, एक इसम गायमुख चौक स्मशानभुमी जवळ येणार असुन त्याने अंगात एक चॉकलेटी पांढ-या रंगाचा शर्ट व करड्या रंगाची चेक्सची पॅन्ट घातलेली असुन त्याने व त्याचा एक साथीदार असे दोघांनी मिळुन सुमारे ५ महीन्यापुर्वी राजस सोसायटी परिसरात दिवसाच्या वेळी घरफोडी चोरी केलेली आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याचे आम्हांस कळविले असता लागलीच आम्ही सदरची बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व पोलीस निरीक्षक सो (गुन्हे)भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविले असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत सुचना दिल्यानंतर आमचे बरोबर असलेले स्टाफच्या दोन टिम तयार करुन खाजगी वाहनाने गायमुख चौकात जावुन सापळा रचुन वॉच केला असता सदर ठिकाणी बातमीतील वर्णनाचा इसम थांबला असल्याचे दिसला बातमीप्रमाणे खात्री होताच अचानपणे छापा घालुन सदर इसमांस १५.१० वा. जागीच पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांस त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव पत्ता १). **दिपक राजेंद्र निखळ वय-१९ वर्ष रा.साईबाबा मंदीर जवळ वेताळनगर आंबेगाव बु॥ पुणे** असे असल्याचे सांगितले नंतर त्यांचेकडे विचारणा केली असता तो उडवाडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यांस पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे अधिक चौकशी करता तपासादरम्यान त्याने सुमारे दीड वर्षापासून कात्रज ,आंबेगाव परिसरात घरफोडी चो-या व ,वाहनांमधून सोन्याचे दागिने चो-या केल्या असल्याचे सांगितल्याने त्याचेकडून **कि.रू.१,५४,५००/- चे सोन्याचे दागिने व एक मोबाईल हॅन्डसेट** असा माल जप्त करण्यात आला आहे.

वरील आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील एकुण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.त्याचा अधिक तपास चालु असून सदरचा आरोपीचा साथीदाराचा शोध चालु असून अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविंद्र रसाळ सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव , पोलीस हवालदार विनोद भंडलकर,श्रीधर पाटील, गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड,समीर बागसिराज,दत्तात्रय पवार, सुमित मोघे, जगदीश खेडेकर यांचे पथकाने केलेली आहे.**